# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**द्वितीय अपील क्रमांक :- १६३९/२०१९/नाशिक मधील शास्तीचे प्रकरण**

१ श्री. बहाउद्दीन हसन शेख, : अपिलार्थी
रा.प्लॉट नं.१४, ईकरा हायस्कूल जवळ,
न्यु अलमास पार्क, गोविंद पुरा,
अहमदनगर, ता.जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
निवासी नायब अभिलेख,
(सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिकरोड,
नाशिक, ता.जि.नाशिक.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
(सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिकरोड,
नाशिक, ता.जि.नाशिक.

**विवेचन**

उपरोक्त अपिलासंदर्भात अपिलार्थी यांनी दिनांक २७/०३/२०१९ रोजीच्या माहिती अर्जान्वये सन १९९३ ते सन १९९४ या कालावधीतील अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे कोर्टातील आर.टी.एस.पुर्नानिरीक्षण अर्ज क्र.०१/१९४ निकाल, दिनांक ०८/११/१९९४ प्रमाणे प्रकरणाचे मुळ अर्ज, दाखल झालेपासून निकाल होई-पावेतो रोजनामासह संपूर्ण प्रकरणाची नकलाची माहिती मागितली होती. त्यानुषंगाने उपरोक्त द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दिनांक ०६/०५/२०२१ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:-

१) "तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार अभिलेख (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिकरोड यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २७/०३/२०१९ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन विहित मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. तसेच माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर दुर्लक्ष व टाळाटाळ केल्याचे दिसुन येते. त्यामुळे त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी

खुलासा त्यांनी आयोगासमोर तात्काळ सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी."

२) "तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिकरोड यांनी अपिलार्थी यांनी दिनांक २५/०४/२०१९ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन निर्णय पारित केला नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दिनांक ३१/०३/२००८ नुसार कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा लेखी खुलासा त्यांनी आयोगासमोर तात्काळ सादर करावा. सदर लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांचे प्रस्तुत प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरुन शासन परिपत्रक दिनांक ३१/०३/२००८ नुसार कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी."

सदर आदेशास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार अभिलेख (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिकरोड, श्री.सुरेश वाकचौरे यांनी आयोगाकडे दिनांक १४/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये टपालाद्वारे लेखी खुलासा सादर करुन असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांच्या दिनांक २७/०३/२०१९ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन मागितलेल्या माहितीबाबत उचित कार्यवाहीसाठी सदर अर्ज जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (अभिलेख शाखा) यांचेकडे पाठविण्यात आला होता. त्यानुसार त्यांनी आरटीएस/पुनरीक्षण/०१/१९९४ राऊत वि.तहसिलदार जामखेड नामक संचिका दिनांक २०/०४/२०१९ रोजीच्या पत्रानुसार अपील शाखेस उपलब्ध करुन दिली. सदर पत्राच्या अनुषंगाने मी अपिलार्थीस संचिकेतील १५पृष्ठांसाठी रुपये २/- प्रमाणे रुपये ३०/- अधिक अंदाजित पोस्टेज खर्च रुपये ३५/- असे एकूण रुपये ६५/- भरणा करणेबाबत कळविले होते. अपिलार्थी यांनी उपलब्ध संचिकेचे अवलोकन केले असता सदर संचिका त्यांचेशी निगडीत नाही म्हणून कुठल्याही प्रकारे भरणा केला नाही. एकंदरीत अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती त्यांचेशी संबंधित नसल्याने त्यांनी ती माहिती घेण्यास नकार दिला, म्हणून अपिलार्थी यांना विहीत मुदतीत माहिती पुरविता आली नाही. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी नव्याने अभिलेखामधील फेरीस्तची फेर चौकशी केली असता, त्यामध्ये अपिलार्थी यांना आवश्यक असलेली आरटीएस/पुनरीक्षण/०१/१९९४, शेख वि.बैरागी नामक म्हणजे सारखा क्रमांक असलेले संचिका आढळुन आली. सदर संचिकेत शोध घेताना फेरीस्त चे अवलोकन केले असता त्यामध्ये १/१९९४ हया प्रकरण समोर शेख वि. चौधरी असे चुकीचे नाव आढळुन आले आहे. म्हणजेच सदरचे प्रकरण अभिलेख कक्षात पाठवतांना तत्कालीन लिपीकाने फेरीस्तचे टंकलेखन करताना बैरागी ऐवजी चौधरी अशी चूक केल्याचे स्पष्ट होते. म्हणुन सदर चुकीमुळे सुरुवातीला आवश्यक संचिकेचा शोध घेणे शक्य झाले नाही. व अपिलार्थी यांना विहित मुदतीत माहिती पुरविता आली नाही. एकंदरीत प्रस्तुत प्रकरणी आरटीएस/पुनरीक्षण/०१/१९९४ क्रमांकाच्या ३ विविध संचिका आढळुन आल्याने फेरीस्तमधील

टंकलेखनाच्या चुकीमुळे आवश्यक संचिकेचा शोध घेण्यास विलंब झाल्याने अपिलार्थी यांना माहिती पुरविता आली नाही. सदर माहिती विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी अपिलार्थी यांना आवश्यक असलेली आरटीएस/पुनरीक्षण/०१/१९९४, शेख वि.बैरागी १ ते ८५ पानांक असलेली संचिका दिनांक ०८/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरविली आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी तांत्रिक अडचणीमुळे अपिलार्थी यांना माहिती पुरविण्यास विलंब झाला आहे. तरी, प्रस्तुत प्रकरणी त्यांनी खुलासा मान्य करण्यात येऊन त्यांच्या विरुध्द शास्तीची कार्यवाही करण्यात येऊ नये, अशी विनंती केली आहे.

सदर आदेशास अनुसरुन तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिकरोड, श्री.उन्मेष महाजन यांनी आयोगाकडे दिनांक १४/०९/२०२१ रोजी टपालाद्वारे लेखी खुलासा सादर करुन असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांनी दिनांक २५/०४/२०१९ अन्वये प्रथम अपील दाखल केले होते. सदर प्रथम अपिलावर दिनांक २७/०५/२०१९, दिनांक ०६/०६/२०१९, दिनांक २४/०७/२०१९, दिनांक १३/०८/२०१९ व दिनांक २०/०८/२०१९ रोजी प्रथम अपील सुनावणी आयोजित केल्या होत्या. तथापि, सदर प्रथम अपील सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित असल्याने त्यांना नेमकी कोणती माहिती हवी आहे हे समजु शकले नाही. तरी, प्रस्तुत प्रकरणी त्यांनी खुलासा मान्य करण्यात येऊन त्यांच्या विरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येऊ नये, अशी विनंती केली आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

प्रस्तुत अपिलासंदर्भातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार अभिलेख (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिकरोड, श्री.सुरेश वाकचौरे यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २७/०३/२०१९ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन मागितलेल्या माहितीबाबत उचित कार्यवाहीसाठी सदर अर्ज जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (अभिलेख शाखा) यांचेकडे पाठविण्यात आला होता. त्यानुसार त्यांनी आरटीएस/पुनरीक्षण/०१/१९९४ राऊत वि.तहसिलदार जामखेड नामक संचिका दिनांक २०/०४/२०१९ रोजीच्या पत्रानुसार अपील शाखेस उपलब्ध करुन दिली. सदर पत्राच्या अनुषंगाने त्यांनी अपिलार्थीस संचिकेतील १५पृष्ठांसाठी रुपये २/- प्रमाणे रुपये ३०/- अधिक अंदाजित पोस्टेज खर्च रुपये ३५/- असे एकूण रुपये ६५/- भरणा करणेबाबत कळविले होते. अपिलार्थी यांनी उपलब्ध संचिकेचे अवलोकन केले असता सदर संचिका त्यांचेशी निगडीत नाही म्हणून कुठल्याही प्रकारे भरणा केला नाही. एकंदरीत अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती त्यांचेशी संबंधित नसल्याने त्यांनी ती माहिती घेण्यास नकार दिला, म्हणून अपिलार्थी यांना विहीत मुदतीत माहिती पुरविता आली नाही. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी नव्याने अभिलेखामधील फेरीस्तची फेर चौकशी केली असता, त्यामध्ये अपिलार्थी यांना आवश्यक असलेली आरटीएस/पुनरीक्षण/०१/१९९४, शेख वि.बैरागी नामक म्हणजे सारखा क्रमांक असलेले संचिका आढळुन

आली. सदर संचिकेत शोध घेताना फेरीस्त चे अवलोकन केले असता त्यामध्ये १/१९९४ हया प्रकरण समोर शेख वि. चौधरी असे चुकीचे नाव आढळुन आले आहे. म्हणजेच सदरचे प्रकरण अभिलेख कक्षात पाठवतांना तत्कालीन लिपीकाने फेरीस्तचे टंकलेखन करताना बैरागी ऐवजी चौधरी अशी चूक केल्याचे स्पष्ट होते. म्हणुन सदर चुकीमुळे सुरुवातीला आवश्यक संचिकेचा शोध घेणे शक्य झाले नाही. व अपिलार्थी यांना विहित मुदतीत माहिती पुरविता आली नाही. एकंदरीत प्रस्तुत प्रकरणी आरटीएस/पुनरीक्षण/०१/१९९४ क्रमांकाच्या ३ विविध संचिका आढळुन आल्याने फेरीस्तमधील टंकलेखनाच्या चुकीमुळे आवश्यक संचिकेचा शोध घेण्यास विलंब झाल्याने अपिलार्थी यांना माहिती पुरविता आली नाही. सदर माहिती विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी अपिलार्थी यांना आवश्यक असलेली आरटीएस/पुनरीक्षण/०१/१९९४, शेख वि.बैरागी १ ते ८५ पानांक असलेली संचिका दिनांक ०८/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरविली आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी तांत्रिक अडचणीमुळे अपिलार्थी यांना माहिती पुरविण्यास विलंब झाला असल्याचे नमूद केले. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी केलेला खुलासा समर्थनीय आहे. म्हणून त्यांच्यावर शास्तीची कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिकरोड, श्री.उन्मेष महाजन यांनी अपिलार्थी यांनी दिनांक २५/०४/२०१९ अन्वये प्रथम अपील दाखल केले होते. सदर प्रथम अपिलावर दिनांक २७/०५/२०१९, दिनांक ०६/०६/२०१९, दिनांक २४/०७/२०१९, दिनांक १३/०८/२०१९ व दिनांक २०/०८/२०१९ रोजी प्रथम अपील सुनावणी आयोजित केल्या होत्या. तथापि, सदर प्रथम अपील सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित असल्याने त्यांना नेमकी कोणती माहिती हवी आहे हे समजु शकले नसल्याचे नमूद केले. तरी उपरोक्त बाबी विचारात घेता तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिकरोड, श्री.उन्मेष महाजन यांनी दिनांक १४/०९/२०२१ रोजी केलेला खुलासा मान्य करण्यात येऊन त्यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(६) मधील नमुद तरतुदीनुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार अभिलेख (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिकरोड, श्री.सुरेश वाकचौरे यांनी केलेला खुलासा समाधानकारक असल्याने मान्य करण्यात येऊन प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२) तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिकरोड, श्री.उन्मेष महाजन यांनी केलेला खुलासा समाधानकारक असल्याने मान्य करण्यात येऊन प्रस्तावित शिस्तभंगविषयक कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

३) प्रस्तुत अपील अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

**(के. एल. बिश्नोई)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नाशिक**

स्थळ :- नाशिक
दिनांक :- 21 OCT 2021

प्रती,

१. श्री.सुरेश वाकचौरे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार अभिलेख (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिकरोड, नाशिक, ता.जि.नाशिक.
२. श्री.उन्मेष महाजन, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिकरोड, नाशिक, ता.जि.नाशिक.